० प्रकरण पहिले ०

तुळशीदास जाधव यांचा परिचय

प्रकरण पहिले

तुळशीदास जाधव यांचा परिचय

बालपण –

सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यातील दहीटणे हे एक छोटेसे गाव. . हे गाव ६00 ते 700 लोकसंख्या असलेले गाव होते. हे गाव पहिल्यापासून काबाडकष्ट करणा–यांचे होते. या गावात एक सर्वसामान्य शेतकरी श्री. सुभानराव अमृतराव जाधव नावाचे एक सद्‌गृहस्थ रहात होते. त्यांची धर्मपत्नी रंगुबाई त्यांच्या सुखी संसारात मोठया प्रमाणात हातभार लावत होत्या. दोघेही शेतातील कष्ट करून आपल्या कुटुंबाची चांगल्या प्रकारे गुजरण करत होते. अशा या सुखी कुटुंबामध्ये 25 जानेवारी 1905 या शुभदिनी तुळशीदासांचा जन्म झाला व सुभानराव व रंगुबाई यांच्या कुटुंबात व नातेवाईकात आनंदोत्सव साजरा झाला. हळुहळु तुळशीदास मोठा होवू लागला. सुभानराव जाधव यांचे कुटुंब हे सर्व सामान्यांचे असल्यामुळे तुळशीदासांना लहानपनातील मौज मजा करण्यात व आनंदात बालपण घालवण्यास ब–याच मर्यादा पडल्या. लहानपण हे रम्य असते. परंतु त्याना लहानपण, जास्त दिवस उपभोगता आले नाही. सुभानराव व रंगुबाई तुळशीदासावर अतिशय प्रेम करायचे. परंतु घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे तुळशीदासांना आपल्या आई–वडिलांना कामात हातभार लावावा लागत असे. त्यांना लहानपणापासुनच शेतातील कामे करावी लागत होती. ते लहानमुलाबरोबर भांडण तंटा करत, हाणामारी करत होते, टवाळकी करत होते. हे सर्व करत असले तरी त्यांची वृत्ती ही महत्वाकांक्षी होती. त्यांनी शेतातील कामे करत

असतानाच आपण शिकले पाहिजे, आपणही शिकून नोकरी करून आपल्या आई–वडिलांना हातभार लावला पाहिजे अशी महत्वाकांक्षा बाळगली होती.

तुळशीदासांनी आपल्या शिक्षणाचा श्री गणेशा वयाच्या 6 व्या वर्षी सुरू केला व पहिल्यांदा ज्ञानमंदिरात प्रवेश केला. 1911 साली आपली शाळा सुरू केली. एकीकडे शिक्षण सुरू असतानाच गुरे राखण्याचेही काम त्यांना करावे लागत होते. लहानपणात तुळशीदासांनी उनाडक्या करणे, समवयस्क मुलाबरोबर दंगामस्ती करणे याही गोष्टी त्यांनी केल्या. हे सर्व करत असताना त्यांच्या अंतःकरणात धार्मिक वृत्ती विषयी आदर होता. त्यांचा देवावर विश्वास होता. सुभानरावांना शेतातील कामात मदत करत होते.

दहिटणे गावात एक छोटेसे घर आणि एक जमिनीचा लहानसा तुकडा यावर कुटुंबाची गुजराण कशीबशी चालत असे. प्रपंचाला हातभार लागावा म्हणून दुस–यांच्या शेतावरही तुळशीदासांच्या आई–वडिलांना काम करावे लागत होते व त्या कामी तुळशीदास हे आपल्या आई–वडिलांना मदत करत होते. शेतावर काम करत असले तरी त्यांचा शिक्षणाकडील ओढा कायम होता. सकाळी शाळा करायची व शाळा सुटल्यानंतर शेतात जावून कामे करायचे. सुट्टीच्या दिवसात गुरे राखणे हे उद्योग करायचे असा हा त्यांचा क्रम सुरू होता.[1]

शिक्षण –

सर्व प्रकारची शेतीसाठी वडिलांना मदत करून आपला शिक्षणाचा क्रम तुळशीदासांनी चांगल्या प्रकारे चालू ठेवला होता. दहिटण्यात श्री. जनार्धन नारायण कुलकर्णी (परितेकर) आणि

काळे मास्तर या दोन्ही शिक्षकांच्या हाताखाली तुळशीदासांचे तिसरी पर्यंतचे शिक्षण झाले हे दोन्ही मास्तर तुळशीदासावर खूप प्रेम करत होते. तुळशीदासांना ते खूप मारत व मन लावून शिकवत होते. तुळशीदासांना शिकवणारे श्री. जनार्धन नारायण कुलकर्णी हे सेवानिवृत्त झाले व त्यांनी सेवानिवृत्त झाल्यावर कुलकर्णी मास्तरनी मंद्रुपला तलाठयाची नोकरी स्वीकारली. त्यांना शिकवणारे दुसरे मास्तर काळे मास्तर(हे मुळचे पानगावचे त्यानीही तुळशीदासावर खूप प्रेम केले व त्यांच्या अभ्यासासाठी खूप मेहनत घेतली. काळे मास्तरनी मुलाना कधी मारले नाही. परंतु एखाद्या प्रश्नाचे उत्तर जर चुकले तर ते त्या विद्यार्थ्यांच्या पोटाचे कातडे धरून चिमटा घेत असत. त्यावेळी तो मुलगा फार तळमळत असे. तुळशीदासांच्याही पोटाचे कातडे धरून ते पिरंगळत असत व ते तुळशीदासाला म्हणत, " तुळशीदास तु गरीब शेतक–याचा पोर आहेस, मोठा झाला पाहिजेस, चांगला अभ्यास कर त्याशिवाय तू मोठा होणार नाहीस."

तुळशीदास शाळेत शिक्षण घेत असताना त्यांना कुलकर्णी मास्तर व काळे मास्तरनी दिलेले कानमंत्र आठवत होते की आपणास आयुष्यात जर मोठे व्हायचे असेल तर आपण खुप अभ्यास केला पाहिजे व शाळेत दररोज जावून ज्ञान संपादन केले पाहिजे. तुळशीदास हे लहानपणापासूनच फार महत्वाकांक्षी वृत्तीचे होते. तुळशीदासाचे तिसरी पर्यंतचे शिक्षण काळे मास्तरव कुलकर्णी मास्तर(परितेकर) यांच्या हाताखाली झाले. कारण दहिटण्यामध्ये तिसरी पर्यंतचे शिक्षणाची सोय होती. [2]

दहिटणे हे गाव प्रथम पासूनच धार्मिक प्रवृत्तीचे गाव होते. या गावी दरवर्षी श्रावण महिन्यामध्ये निरनिराळया पोथ्या चाळत. गावातील सर्व लोकांचा धार्मिकतेकडे ओढा होता.

त्यातच तुळशीदासांचे आई–वडिलांचा देवावर मोठया प्रमाणात विश्वास होता. त्यामुळे ते गावातील पोथी ऐकण्यासाठी न चुकता हजर होते. तुळशीदासांनाही पोथी ऐकण्यास आई–वडील घेवून जात होते. यावेळी दहिटण्यात नागोपंत भटजी या नावाचे एक विद्वान शिक्षक होते व ते पोथीचा अर्थ सांगत होते. नागोपंत भटजी ते पोथीचा अर्थ सांगत असताना एवढे भावनावश होवून अर्थ सांगत व सांगताना ते इतरांना रडवत व स्वतःही रडत. लोक त्यांना आदराने 'आबा' असे म्हणत. प्रथम पोथी वाचण्यासाठी नागोपंत भटजी व बापू काशीद यानी तुळशीदासांना पोथी वाचण्याचा आग्रह धरला व तुळशीदासांनी त्यांचा आग्रह मान्य करून तुळशीदासांनी पोथी वाचण्यास सुरूवात केली. प्रथम–प्रथम ते वाचण्यास घाबरत पण पुढे पुढे ते धिट झाले व ते चांगल्या प्रकारे पोथी वाचू लागले. त्यामुळे गावात त्यांचे कौतुक होवू लागले व गावात त्यांना प्रतिष्ठा व मान मिळू लागला. दहीटणे प्रथम पासूनच धार्मिक वृत्तीचे गाव असल्यामुळे गावातील पंढरीच्या वारीसाठी पंढरपुरला जाणारी गावात बरीच घराणी होती. त्यापैकी बाजीराव डोईफोडे यांचे एक घराणे होते हे दरमहा पंढरपुरच्या वारीला दरमहा न चुकता जात असत. तुळशीदासांचे आई–वडील हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या आईची म्हणजे रंगुबाईची विठ्ठलावर फार श्रध्दा होती.

योगीराज महाराजांचा प्रभाव –

दहिटण्यातील बाजीराव डोईफोडे हे गृहस्थ दरमहिण्याला एकादशीला जात होते व गावातीलही लोक वारीला जात. डोईफोडे यांचा पंढरपुरातील मुक्काम हा योगीराज महाराजांच्या मठात होता. त्यामुळे दहिटण्यातील ब–याच लोकांचा मुक्काम योगीराज महाराज यांच्या मठात

होता. एकदा बाजीराव डोईफोडे यांच्याकडे योगीराज महाराज आले असता श्री. बापू काशीद यांच्या वाडयात त्यांचे किर्तन झाले व ते ऐकण्यासाठी तुळशीदास आपल्या आई–वडिलांबरोबर किर्तनास आले या गावामध्ये योगीराज महाराज यांचे किर्तन म्हणजे गावक–यांना उपदेशाचे अमृतपान घडत असे. किर्तन करत असताना महाराज फार मार्मीक उदाहरणे देवून आपले विचार सर्व सामान्य लोकापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करत असत. त्या किर्तनामध्ये महाराजानी मांसाहार करणा–या व्यक्तीवर मोठया प्रमाणात आघात केला. ते म्हणत मुक्या प्राण्याला मारून त्यांचे मांस आपण खायचे व त्यांचा आत्मा तडफडत ठेवायचा ते ही इतर प्राण्याप्रमाणेच आहेत. बक–या व कोंबडयांचे जीव घ्यायचे व त्यांचे मांस मोठया चवीने खायचे . ते म्हणत मांस खाण्याला शास्त्राधार नाही. ईश्वराने सर्वांना आत्मा दिला आहे. सर्व लेकरे ही ईश्वराला सारखीच आहेत. अशा प्रकारचे योगीराज महाराजांचे मार्मीक किर्तन ऐकल्यानंतर तुळशीदासांच्यावर योगीराज महाराजांच्या विचारांचा फार मोठया प्रमाणात पगडा पडला व तेव्हापासून म्हणजे वयाच्या नवव्या दहाव्या वर्षापासून तुळशीदासानी मांसाहार करणे सोडून दिले व तेव्हापासून सुभानराव , रंगुबाई व तुळशीदास हे सर्व विठ्ठल भक्त झाले व तेव्हा पासूनच तुळशीदासानी देवाची माळ घालण्याचा निश्चय केला आणि त्यानी आपल्या आई–वडिलांना माळ घालण्याविषयी सांगितले.

पंढरपुरच्या चैत्रीवारीसाठी सुभानराव रंगुबाई व तुळशीदास हे तिघेजन गेले. त्यानी आपला मुक्काम योगीराज महाराजांच्या मठात केला. चंद्रभागेच्या वाळवंटात वारी निमित्त किर्तन सुरू होती ती ऐकण्यासाठी अनेक लोक वाळवंटात हजर होते. दुस–या दिवशी एकादशी होती. एकादशी निमित्त फराळाचे सामान तयार होते. फराळाचे झाले होते, तुळशीदासांना आई वडीलांनी फराळ करण्यास सांगितले तेव्हा त्यांनी आपल्या वडीलांना सांगितले की, मी माळ घातल्याशिवाय

फराळ करणार नाही. तुळशीदासांनी माळ घालण्याचा हट्ट धरला. कितीही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु तो प्रयत्न निष्फळ ठरला. शेवटी आई वडीलांनी तुळशीदासाला योगीराज महाराजांकडे नेले. तुळशीदासाचा दृढ ऐकून महाराजांना कौतुक वाटले. लहानपणापासून ज्यांच्या अंत:करणात अशा त–हेची धर्मभावना प्रज्वलीत होते ती मुले मोठेपणी थोर पदाला चढतात बरं सुभानराव. असं महाराजानी सांगितले व मोठा झाल्यानंतर माळ घालं असे तुळशीदासाला सांगितले. परंतु तुळशीदास आपला हट्ट कांही सोडेना. तेव्हा योगीराज महाराजानी माळ तुळशीदासाच्या अंगावर टाकली व म्हटले की पापाचा धनी मी होणार नाही. कारण तुला माळ माझ्या हातून घातली व तुला ते पेलवले नाही तर त्या पापाचा धनी मी होणार नाही. कारण माळ घातल्यानंतर अभक्ष भक्षण करणे पाप आहे. मुलाकडून त्या गोष्टी पाळल्या जात नाहीत असे योगीराज महाराज म्हणाले. परंतु मी ते पथ्य कटाक्षाने पाळेन असे तुळशीदासांनी आश्वासन महाराजांना दिले व त्यानी ते कटाक्षाने पाळले. शेवटी पडत्या फळाची आज्ञा घेवून तुळशीदासांनी ती माळ आपल्या हाताने गळयात घातली व महाराजानी सांगितलेल्या आश्वासनाचे तुळशीदासांनी कटाक्षाने पालन केले.[3]

वरील सर्व प्रकार पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, तुळशीदास हे लहानपणापासून किती हट्टी व महत्वाकांक्षी होते. त्यानी महाराजांच्या माळ घालण्याच्या विरोधाला न जुमानता आपला माळ घालण्याचा हट्ट त्यांनी पूर्ण केला व महाराजानी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याचे वचन त्यानी पूर्ण केले. लहानपणापासून शिक्षणाची आवड असल्यामुळे तिसरी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे काय करायचे पुढील शिक्षण कुठे घ्यावयाचे हा एक मोठा प्रश्न तुळशीदास

यांच्यापुढे उभा राहिला. चौथीचे शिक्षण दहीटण्यात मिळत नाही तेव्हा आपल्या शिक्षणासाठी जवळचे गाव निवडणे गरजेचे होते.

शिक्षणासाठी वैरागला –

तुळशीदासाचे मराठी तिसरीपर्यंतचे शिक्षण दहिटण्यात पूर्ण झाले. त्या गावात चौथ्या इयत्तेचा वर्ग नव्हता. तेव्हा पुढील शिक्षणासाठी वैराग हे ठिकाण निवडण्यात आले. तेथे पुढील शिक्षणाची सोय होती. पण त्यांच्या आई–वडिलांना आपल्या एकुलत्या मुलाला वैरागला पाठवण्यास प्रथम विरोध होता. आईने शिक्षणात विरोध दर्शवला परंतु तुळशीदासांनी आईची समजूत घातली व त्यानी तुळशीदासांना वैरागला शिक्षणाला घालण्यास आईने परवानगी दिली. त्यानी आपल्या आईला सांगितले की, आई आपल्या गावातील बाजीराव डोईफोडे यांचा मुलगा रामकृष्ण शिकून मास्तर झाला आहे. मला सुध्दा तसेच शिकून मोठा व्हायचे आहे. मी शिकणार व त्यासाठी मला वैरागला पाठव व शेवटी आईने वैरागला शिक्षणास जाण्यास परवागनी दिली. वैरागला शिक्षणासाठी जाण्याचा निर्णय पक्का झाला.

वैराग मधील लोकल बोर्डाच्या शाळेत तुळशीदासांचे नाव शाळेत घातले. तेथे प्राथमिक शाळेत ते शिक्षण घेवू लागले. त्या शाळेत श्री. गोविंद नारायण गोरे या नावाचे एक गुरूजी होते. त्याना तुळशीदासाच्या आर्थिक परिस्थितीविषयी माहिती होती. यामुळे ते तुळशीदासाच्या शिक्षणाकडे लक्ष देत. तुळशीदासाची शिक्षणाबाबतची चीकाटी पाहून गोरे गुरूजींनी तुळशीदासांना अभ्यासासाठी आपल्या घरी बोलावून त्यांच्याकडून अभ्यास करून घेते. जर एखादी गोष्ट समजली नाही तर ते पुन्हा–पुन्हा समजावून देत. तुळशीदास जेव्हा जेव्हा गुरूजींच्या घरी जात तेव्हा

त्यांच्या घरातील हाती पडेल ती कामे करत. गोरे गुरूजींना तुळशीदासाच्या घरची परिस्थिती माहित असल्यामुळे ते तुळशीदासाला पैशाचीही मदत करत असत. हया त्यांच्या गुरू–शिष्यांच्या प्रेमळ संबंधामुळे त्यांच्या एक प्रकारे अतूट नाते निर्माण झाले. तुळशीदास हे खेडयातील असल्यामुळे त्यांच्या भाषेत गावंडळपणा जाणवत होता. त्यामुळे गोरे गुरूजीं त्याना शुध्द बोलण्यास सांगत होते. गोरे गुरूजी हे हाडाचे शिक्षक असले त.री/ते स्वभावाने फार प्रेमळ होते. गरीबा घरचा मुलगा शिक्षण घेवू लागला म्हणजे त्याची मनःस्थिती किती अनुकंपनीय असते याची त्याना जाणिव होती. श्री. गोरे गुरूजींची पत्नी सुध्दा फार प्रेमळ होत्या. त्याही तुळशीदासावर फार प्रेम करत. या अशा प्रेमळ वातावरणात तुळशीदासांच्या शिक्षणाचा पाया भक्कम होत गेला.[4]

तुळशीदास शिक्षणासाठी वैरागला असताना तेथील रहिवाशी श्री. भिमसींग रजपुत यांच्या घरी रहात होते. त्यांच्या कुटुंबाने तुळशीदासाला आपल्याच कुटुंबातील सभासद असल्यासारखे वागवत होते. ते तुळशीदासावर आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करत होते. तुळशीदास वैरागला रहात असताना त्यांच्या मातोश्री रंगुबाई हया आपल्या शेतातील कामधंदा उरकून आठवडयाच्या बाजाराला बुधवारी वैरागला येत असत. चार–चार दिवसाच्या भाकरी बांधून दहिटण्यापासून वैरागचे पाच मैलाचे अंतर पायी चालत येवून आणून द्याव्यात आणि त्या भाकरी तुळशीदासानी पाण्याच्या घोटाबरोबर मिरचीच्या भुकटीबरोबर खाव्यात व संध्याकाळी म्युनिसिपालटीच्या सार्वजनिक कंदीलाखाली बसून अभ्यास करणा–या म. फुले, डॉ. आंबेडकर या थोर नेत्यांची आठवण करत होते. दैन्य पत्करून लोकांचे शिव्याशाप खावून चंदनापरी देह झिजवणा–या म. फुल्यांची मुर्ती डोळयापुढे उभी करून आणि मनात विचार करून त्या थोर महात्म्याची हालअपेष्ठा व कष्ट सहन करण्याची प्रवृत्ती व त्यातून त्याना प्राप्त झालेले महात्म्य हे त्याना आठवत होते.

आपण जर मोठे व्हायचे असेल तर आपणासही हालअपेष्टा कष्ट सहन केल्याशिवाय आपणास मोठे होता येणार नाही. त्याच जिद्दीने ते अभ्यास करत होते. तुळशीदास चार–चार दिवसाचे शीळे जेवण करत असल्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली व ते आजारी पडले. तेव्हा त्यांच्या मातोश्री रंगुबाईनी आपल्या पंढरपुरच्या वारीच्या ओळखीने सोनबा कोळी यांच्याकडे जेवणाची व्यवस्थ केली व त्यासाठी रंगुबाई आठ–आठ दिवस पुरेल ऐवढे पिठ जळण, चटणी इत्यादि वस्तू सोनबाच्या घरी आणून देत. सोनबा व त्यांची पत्नी लक्ष्मीबाई यानी जर एखाद्या दिवशी पिठ, डाळ संपली तर आडून न बसता आपल्या घरचे जेवण घालत होते. सुभानराव ही अधूनमधून सरपणाची गाडी सोनबाच्या घरी आणून देत असत. तुळशीदास वैरागला शाळेला असताना दहिटण्याचे बरेच जन शाळेला होते. त्यात अण्णा काशीद, कृष्णा दळवी, रंगनाथ बापू काशीद ही मुलेही वैरागला शिकत होती.

मातोश्री रंगुबाई प्लेगच्या रोगाने आजारी व पांडूरंगाच्या कृपेने सुटका –

तुळशीदास वैरागला शिकत असताना दीड वर्षानी म्हणजे 1915 रोजी दहिटण्यामध्ये प्लेगची साथ आली होती. दहीटणे हे गाव छोटे असल्यामुळे तेथे दवाखाण्याची सोयी नव्हती. गावामध्ये दररोज प्लेगच्या साथीने वीस बावीस माणसे मरत होती. या भितीने सारे गाव बाहेर पडत होते. त्यातच सुभानराव व रंगुबाई यानी वैरागच्या वाटेवर असलेल्या यमाजी काशीद यांच्या शेतात झोपडी घातली होती. एवढे करूनही शेवटी व्हायचे तेच झाले व रंगुबाईनाही प्लेगने गाढले. उजव्या मांडीला फोड उठला, ताप येवू लागला, शेवटी नियतीने सुभानरावच्या कुटुंबावर ही आघात केला. परंतु प्रथम रंगुबाईनी आपल्या पतीला कांही कळू दिले नाही. कारण ते घाबरतील, मुलाला

समजले तर तुळशीदास शाळा सोडून गावाकडे येईल तेव्हा तिने कोणालाही कळू दिले नाही. परंतु ताप वाढतच होता. एके दिवशी त्या तापाने कणकणत होत्या. फोड मोठा होत होता. रंगुबाईना प्लेग झाल्याची वार्ता वा–यासारखी सर्व गावात पसरली. तेव्हा गावातील सर्वजन हळहळ करत होते. कारण प्लेग झालेली व्यक्ती जगत नव्हती.

शेवटी मातोश्री रंगुबाईना प्लेग झाल्याची वार्ता दहिटण्यातच नव्हे तर सर्व वैराग भागात फोफावली होती. तुळशीदासानाही बातमी समजताच ते यमाजी काशीद यांच्या शेतातील झोपडीत आले. आई खाटेवर झोपलेल्या होत्या व त्या विव्हळत होत्या. शेजारी चिंताग्रस्थ स्थितीत सुभानराव बसले होते. हे दृश्य पाहिल्याबरोबर तुळशीदासाच्या छातीत धस्स झाले. ते रडू लागले. रंगुबाईनी तुळशीदास आल्याचे पाहून आपल्या जवळ बोलावून कवटाळून घेतले व म्हणाल्या, माझया चिमण्याला आता कोण आहे ? माझया बाळाला सांभाळा बरं । असं म्हणून त्या रडू लागल्या. तुळशीदास ही रडू लागले व सुभानरावाच्या डोळयात आश्रु तरळू लागले. परंतु रंगुबाई हया विठ्ठल भक्त होत्या. त्यांचा देवावर फार विश्वास होता. त्याना असे वाटत होते की माझ्या चिमुकल्याला एकटा सोडून देव मला मारणार नाही. असं बोलून त्यांनी तुळशीदासाला व सुभानरावाना धीर दिला. दुस–या दिवशी दशमी होती. पंढरीच्या वारीला जाण्याचा सुभानरावाचा नियम अद्याप कधी चुकला नव्हता. पण आता त्यांच्यापुढे मोठा प्रश्न निर्माण झाला होता. घरात बायको आजारी असताना आपण देवाला जाणे बरे नाही असे सुभानरावाना वाटत होते. तेवढयात रंगुबाईनाही एकादशीची आठवण झाली व त्यानी एकादशीसाठी पंढरपुरला जाण्यासाठी आपल्या पतीला सांगितले तेव्हा सुभानरावापुढे मोठा पेच निर्माण झाला. विठ्ठल तुच या कोडयातून सोडव असे सुभानरावानी विठ्ठलाकडे साकडे घातले. प्रथम सुभानरावानी रंगूबाई आजारी असल्यामुळे

वारीला जाण्यास नकार दिला. परंतु रंगुबईनी त्याना सांगितले, माझे काय व्हायचे असेल ते होवू द्या पण वारी चुकवू नका. देव कांही आपले वाईट करणार नाही. पांडूरंगावरची अनन्य भक्ती त्यांची वारीला जाण्याबद्दलची आतुरता वाढवीत होती. पण बायकोची अवस्थ पाहून त्याना नको वाटत होते. रंगुबाईचा ताप वाढत होता. नवमीचा दिवस उजाडला त्या बेशुद्ध अवस्थेतच होत्या. त्याना अंगावरच्या कपडयाचीही शुद्ध नव्हती. एवढी बिकट परिस्थिती रंगुबाईची झाली होती. सर्वांनी आता आशा सोडली होती व सुभानराव रडू लागले. तुळशीदास रडू लागले. पण शेवटी देवाला सुध्दा कधी–कधी गुणी मानसाची दया येते. त्याचे प्रत्यय रंगुबाईना आले. रंगुबाई कधी शुद्ध्दीत तर कधी बेशुद्ध अवस्थेत असायच्या. अशा परिस्थितीत त्यानी डोळे उघडले व झोपडीच्या दरवाजाकडे पाहिले. दोन शिपाई हातात दंडा घेवून दरवाजात उभे असलेली रंगुबाईना दिसले. त्यावेळेस त्या शि..... शि....पा...ई अशा अस्पष्ट शब्दात उच्चारल्या व भिऊ लागल्या. लोकाना वाटले यमदूत निहावयास आला आहे. आता तर सर्वानीच आशा सोडली. सर्वत्र आक्रोश सुरू झाला. तेवढयात रंगुबाईची नजर झोपडीच्या आठयाकडे वेधले गेले. त्या वेळेस त्या अर्धवट भानावर होत्या. तेव्हा त्याना या आठयावर खाली पाय सोडून बसलेली विठ्ठलाची मुर्ती दिसली. ती मुर्ती रंगुबाईकडे पाहून हसत होती. त्या आपल्या विठ्ठलाकडे पाहून हसत होत्या. त्यांना हळू हळू शुद्ध येवू लागली. त्या माझया विठ्ठला माझ्या पांडूरंगा असे म्हणत चाचपडत होत्या. त्यानी त्या मुर्तीचे झोपूनच दोन्ही हात जोडून दर्शन घेतले. सर्व मंडळीच्या चेह–यावर समाधानाची छटा लहरू लागल्या. अशा प्रकारे देवावरच्या अतुट श्रध्देने पांडूरंगावर रंगुबाईनी जी निःस्वार्थीपणाने केलेल्या भक्तीचे त्याना विठ्ठलाने फळ दिले. त्यांची प्रकृती हळू हळू सुधारू लागली. दुस–याच दिवशी एकादशी होती. सुभानराव पंढरपूरला वारीसाठी गेले.

कृतज्ञतेने त्यानी विठ्ठलाचे दर्शन घेतले. दोन चार दिवसात त्यांची प्रकृती चांगली झाली व तुळशीदास आपल्या शिक्षणासाठी वैरागला गेले. वैरागला शिक्षण चालू असतानाच रंगुबाईनी गावातील साठे यांच्या मुलीशी तुळशीदासाचे सोयरीक जमवून आणले. कारण शाळेत शिक्षण घेत असताना तुळशीदासाची पोटाची निट सोय होत नव्हती. व ते अशक्य झाले होते. त्यामुळे त्यांच्या पोटाची सोय व्हावी या उद्देशाने रंगुबाईने तुळशीदासाचे लग्न जमवले. [5]

विवाह –

दहीटणे गावामध्ये अनेक घराणी होती. त्यात साठे नावाचे घराणे होते. सुभानराव व आबासाहेब साठे यांचे प्रथम पासूनच चांगले संबंध होते. आबासाहेबाचे घराणे बार्शी तालुक्यातील मुंगशी – मालेगाव येथील वतनदार पाटील होते. दहीटण्यात आल्यानंतर सुभानराव व आबासाहेब या उभयतामध्ये स्नेह जमल्यानंतर आबासाहेबानी तुळशीदासाच्या लग्नाविषयी विचारले. जनाबाई हया आबासाहेबांच्या द्वितीय कन्या आहेत. तेव्हा सुभानरावाना कांहीच समजेना तेव्हा आबासाहेबानी आपले अंतकरण धिट करून म्हटले की माझी मुलगी जना आपल्या तुळशीदासाला द्यावी असं मला वाटतं. कारण दोघांचा जोडा कसा लक्ष्मी नारायणासारखा शोभून दिसेल. आबासाहेबानी आपल्या मनातील विचार सुभानरावाना सांगितला. तेव्हा सुभानरावाना वाटले की आबासाहेबांचे घराणे हे वतनदार पाटलाचे आणि आम्ही साधे शेतकरी तेव्हा आबासाहेबानी सांगितले, मी पण आपणासारखा एक साध्याच मानुस आहे. तेव्हा मी माझी जना तुमच्या तुळशीदासाला दिली हे पक्के समजा. हे ऐकून रंगुबाईना फार आनंद झाला. एका पाटलाची मुलगी आपल्या घरी सून होवून येणार याचा त्यांना फार आनंद झाला. त्यावेळेस अगदी बालवयात

लग्न करण्याची प्रथा होती. त्याचप्रमाणे दिलेला शब्द पाळण्याची ही रीत होती. रंगुबाई आजारातून व्यवस्थित झाल्या होत्या. त्यामुळे त्यांना आपल्यामुलाचे लग्न लवकर आपल्या डोळयादेखत व्हावे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे रंगुबाईनी व सुभानरावानी तुळशीदासाचे लग्न लवकर उरकण्याचे ठरवले. लग्न करावयाचे ठरवले तेव्हा तुळशीदास जेमतेम 12–13 वर्षाचे असतील व आबासाहेब यांची मुलगी जना हीचे वय अवघे 8 वर्षाचे होते. लग्न ठरवले तेव्हा तुळशीदासाला या गोष्टीची कांहीच कल्पना नव्हती. ज्यावेळेस लग्नाचा मुहुर्त काढला तेव्हाच तुळशीदासांना वैरागहून दहीटण्याला बोलावून घेतले व तेव्हाच तुळशीदासाना लग्नाविषयी हकिगत समजली. लग्न 1918 या साली ठरवले.[6] लग्नाचा मुहुर्त ठरवण्यात आला तेव्हा गावामध्ये लग्नाच्या वेळेस बकरे मारण्याची पध्दत होती. अनेक गावातील लोकांनी रंगुबाईना तुळशीदासाच्या लग्नात बकरे मारण्याविषयी कल्पना मांडली. तेव्हा त्यानी बकरे मारण्यास नकार दिला. त्या म्हणाल्या, कोणताच देव बकरे, कोंबडया मागत नाही. देवाच्या नावाखाली लोकाना आपल्या जिभेचे चोचले भरण्यासाठी देवाचे नाव पुढे केले जाते. मी माझ्या विठ्ठलाला मानते. मला त्याने कोंबडे, बकरे मारण्यास सांगितले नाही. तेव्हा लोकांनी बक–याचा आग्रह धरला नाही व जनाबाई आणि तुळशीदास यांचे लग्न साध्या पध्दतीने व मोठया थाटात पार पडले. लग्नामध्ये दोन्हीही बाजूची मंडळी सुजान असल्यामुळे भांडण तंटयाचा प्रश्नच उद्‌भवला नाही.

अशा प्रकारे तुळशीदास व जनाबाई यांचे लग्न झाले. आई–वडीलांनी पोटाचा प्रश्न मिटवला तरी शिक्षणासाठी लागणारे पुस्तके वहया, पेन या सर्व गोष्टीसाठी लागणारा खर्च आईवडिलांना भागवणे अशक्य होते. तेव्हा त्यानी आपण आई वडिलांना त्रास देवू नये असे त्याना वाटले होते. तेव्हा त्यांच्या डोक्यात एक कल्पना सुचली. पुण्याच्या डेक्कन मराठा एज्युकेशन

सोसायटीकडे शिक्षणाला मदत मिळावी म्हणून अर्ज केला तेव्हा संस्थेने तुळशीदासाच्या अर्जाचा विचार करून दरमहा दोन रूपये मदत पाठवण्याचे ठरवले. परंतु एवढया मदतीने तुळशीदासाचे भागणार नव्हते. तेव्हा वैरागला बाजाराच्या बुधवार या दिवशी कांहीतरी कामे करून मिळालेल्या पैशातून आपला खर्च भागवत होते. अशा हालअपेष्टा सोसून तुळशीदास आपले शिक्षण शिकत होते. 1920 साली ते सातवीमध्ये शिकत होते व तेव्हा व्हर्नाकुलर फायनलच्या पूर्व परिक्षेची तारीख जवळ येत चालली. कष्ट करून शिक्षण घेण्याची तपश्चर्या चालूच होती. परंतु अभ्यास करण्यासाठी आवश्यक तेवढा वेळ त्याना मिळत नव्हता. त्या काळात व्हर्नाकुलर फायनल पास होणे अत्यंत महत्वाचे होते. परंतु तुळशीदास त्या परीक्षेला बसले व ते दुर्दैवाने नापास झाले. त्याना आपण परीक्षेत नापास झाल्याचे खूप दुःख झाले. त्याना नापास झाल्यामुळे अन्नही गोड लागेना. तेव्हा एके दिवशी ते उपाशी असताना त्यांचा चेहरा सुकलेला पाहून गोरे गुरूजींनी त्याना समजावले. कारण गोरे गुरूजीना माहीत होते की हा मुलगा फार जिद्दी व चिकाटीने अभ्यास करत होता. परंतु त्याची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे कामे करून हा मुलगा शिकत होता. त्यामुळे तो पूर्व परीक्षा नापास झाला. तेव्हा व्हर्नाकुलर फायनल मुख्य परीक्षेचा फॉर्म भरण्यास इतर शिक्षकानी विरोध दर्शवला तेव्हा गोरे गुरूजीनी त्यांची समजूत घालून त्याना सांगितले की हा मुलगा फार जिद्दी आहे व कष्टाळू आहे. जर त्याने अभ्यास केला तर सुदैवाने तो पास होईल व आपल्या आई–वडिलांना सुख देईल. त्यांचा संसार हा सुखी होईल. तेव्हा इतर शिक्षकानाही त्यांचा स्वभाव माहीत होता. तेव्हा गोरे गुरूजीनी सांगितलेले सर्वांना पटले व त्यांनी तुळशीदासास परीक्षेला बसण्याची परवानगी दिली. हे ऐकून तुळशीदासाला फार आनंद झाला. ७

तुळशीदासांना व्हर्नीकुलर फायनल परीक्षेस बसण्याची परवागनी दिली तेव्हा त्यांना फार आनंद झाला व त्याचबरोबर अनेक अडचणी निर्माण झाल्या. कारण व्हर्नीकुलर परीक्षा ही सोलापुरला होती. तेव्हा तुळशीदासाने सोलापूर कधी पाहिलेही नव्हते. जेवणाची काय सोय करायची हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला होता. तेव्हा गोरे गुरूजीना ही गोष्ट समजली तेव्हा गोरे गुरूजीनी रहाण्याची व जेवणाची व्यवस्था आपल्या घरी केली व तुळशीदासाला लागणारा खर्च ही त्यानी भागवला. परीक्षेला वैरागचे सुमारे पंधरा विद्यार्थी बसले होते. परीक्षा झाली. सुदैवाने तुळशीदास चांगल्या मार्काने उत्तीर्ण झाले. सर्व गुरूजनांचे आशिर्वादाने व गोरे गुरूजींच्या आशिर्वादाने ते पास झाले. सर्वांना फार आनंद झाला. त्याचप्रमाणे रंगुबाई व सुभानराव यांनाही फार आनंद झाला.

अतिशय कष्टाने आणि हालअपेष्टा सोसून तुळशीदास 1920 साली व्हर्नीकुलर फायनल परीक्षा पास झाले. परीक्षा पास झाल्यानंतर त्यांच्या डोळ्यापुढे नोकरीची कल्पना प्रकट झाली. आपल्याला नोकरी मिळाल्यानंतर आपण आपल्यासाठी ज्यानी हालअपेष्टाचे जीवन जगलेल्या आपल्या आई–वडिलाना सुख द्यायचे व आपली परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करायचा. परंतु त्यांच्यापुढे आपल्याला नोकरी देणार कोण ? कारण त्यांचा कुठे वशीला नव्हता. परंतु म्हणतात ना "देव तारी त्याला कोण मारी" या म्हणी प्रमाणे प्रयत्न केल्यानंतर संत नावाचे डेप्युटी यांच्या प्रयत्नाने तुळशीदास वैरागला ज्या शाळेत शिकले त्याच लोकल बोर्डाच्या शाळेत 1921 साली तुळशीदासांना शिक्षकाची नोकरी लागली. परंतु ही नोकरी आठ ते नऊ महिनेच होती. आठ–नऊ महिने बरे गेले परंतु तुळशीदासाना आपणाला लाभलेली नोकरी ही कायम स्वरूपाची नाही हे त्याना

माहित होते. नोकरी संपली व नंतर पुढे काय करायचे आपले पुढील आयुष्य कशा प्रकारे घालवायचे हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहीला.[8]

तुळशीदासांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना –

तुळशीदासांना वैरागच्या लोकल बोर्डाच्या शाळेत मिळालेली नोकरी आठ–नऊ महिन्यानंतर गेली. त्यानंतर आणि आयुष्याविषयी काय करायचे हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला होता. आणि ज्यावेळेस वैरागला नोकरीला होते तेव्हा महात्मा गांधी बार्शीला येणार असे समजले. बार्शीला त्यांचे व्याख्यान आयोजित केले होते. महात्मा गांधी त्यावेळी राष्ट्रीय नेते होते. त्यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी आसपासच्या खेडयातील हजारो लोक बार्शीच्या दिशेने जात होते. तेव्हा तुळशीदासांना बार्शीला गांधीजीचे विचार ऐकण्यास जावे असे वाटले. वैराग ते बार्शी यातील अंतर 13/14 मैल आहे. बैलगाडया, सायकलीतून लोक वैरागच्या दिशेने निघाले होते. ज्यावेळेस महात्मा गांधी बार्शीला येणार होते तेव्हा स्वातंत्र्य लढयाची देशाची सुत्रे त्यांच्याकडे आली होती. प्रथम ही सुत्रे लोकमान्य टिळक यांच्याकडे होती. महात्मा गांधीनी सत्य, अहिंसा, असहकार व निशस्त्र लढा या चार सुत्रानी भारतीय राजकारणाला नवी दिशा दिली आणि हे विचार ऐकण्यासाठी लोक येत होते. ज्याप्रमाणे पांडूरंगाच्या दर्शनासाठी पंढरपुरला लोकांची रिघ असते त्याप्रमाणे स्वराज्याच्या या वारीत आपणही सामील व्हावे असा तुळशीदासाने निर्धार केला. त्यावेळी त्यांचे वय 16 वर्षाचे होते व ते बार्शीच्या दिशेने चालत निघाले. सर्व लोकांनी गांधीजीना पहाण्यासाठी व ऐकण्यासाठी लोकांची गर्दी झाली होती. त्या गर्दीतून तुळशीदास रस्ता काढत व्यासपीठाचे जवळ आले होते. लोक ज्यांची आतुरतेने वाट पहात होते त्या गांधीजींचे व्यासपीठावर आगमन झाले व ते

व्यासपीठावर आल्यावर टाळयांचा कडकडाट झाला. त्यांच्या नावाचा जयजयकार झाला. टाळयांच्या कडकडाटात महत्माजींनी जमलेल्या समुदायाकडे सस्मीत मुद्रेने पाहिले. सर्व जनसमुदायाचे महात्माजींच्या मुखातून निघणारे शब्द ऐकण्यासाठी प्राण कानात एकवटले. गांधीजीनी आपल्या भाषणाची सुरूवात अशी केली. " प्यारे भाईयो बहनो " गुलामगिरीत जखडलेल्या हिंदुस्थानचे चित्र त्यांनी सर्वांच्या नजरेसमोर उभे केले. देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आपणकोणता मार्ग अवलंबायचा या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले. गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी अहिंसात्मक मार्ग सांगितला होता. गांधीजीच्या लढयाची ही प्राथमिक अवस्था होती. गांधीजीनी विधायक कामे सांगितली त्यात स्वदेशी आणि खादी वापर यावर अधिक भर देण्यात आला. खादीचे व स्वदेशीचे व्रत त्यानी त्यावेळेपासून स्वीकारले होते. तुळशीदासांनी महात्माजींचा प्रत्येक शब्द अंतःकरणात साठवून ठेवला होता आणि हे अमृताचे शब्द ऐकून तुळशीदासांचे परिवर्तन झाले व देश स्वातंत्र्याच्या लढयाकडे लक्ष केंद्रीत होवू लागले9

गांधीजींची प्रेरणा –

गांधीजींची प्रेरणा सन 1921 मध्ये शाळा मास्तर असताना बार्शीला गांधी आले होते. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी 13–14 मैल चालत गेले होते. गांधींजींचे भाषण ऐकण्यासाठी आसपासच्या खेडण्यातील हजारो लोक आले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले होते, "हजारो मैलावरून इंग्रज येथे आले त्यांनी सुमारे 150 वर्ष भारतावर अनियंत्रित राज्य केले. त्यांच्या राज्यात उपासमार, रोगराई, गरीबी, जुलुम यामुळे देश हैराण झाला आहे. इंग्रजांचे राज्य आपण सर्वांनी मिळून घालवले पाहिजे." [10]

महात्माजींनी अशा प्रकारे जे पोटतिडकीने भाषण केले त्या भाषणाने सर्व श्रोते भारावून गेले आणि तुळशीदासांच्या ही मनावर तेव्हापासून सखोल परिणाम झाला. गांधीजींच्या भाषणाने तुळशीदासाच्या जीवनात एकदम कलाटणी देणारा प्रसंग निर्माण केला. त्यानी आपले जीवन देशासाठी वाहून घेण्याचा दृढ निश्चय केला. "देह जावो अथवा राहो, पांडूरंगी दृढ भावो " या उक्तीप्रमाणे त्यानी देश हाच आपला देव मानून त्याच्या सेवेसाठी आयुष्य घालण्याचे ठरवले. शेवटी वैरागला लोकल बोर्डाच्या शाळेत लागलेली नोकरी सुटली. नोकरी सुटल्यामुळे तुळशीदासाला दहीटण्याला परतावे लागले. गावातील लोक नोकरी गेल्यामुळे चिडवत होते. हे चिडवणे त्यांना आवडले नाही व त्यानी एके दिवशी सकाही उठून आई–वडिलांना नमस्कार करून पांडुरंगावर भरवसा ठेवून नोकरी शोधण्यासाठी सोलापुरच्या दिशेने पायी प्रवास सुरू केला. संध्याकाळी ते सोलापुरला पोहचले. सोलापुरला पोहचल्यानंतर आपण खायचे कुठे ? हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. पायी चालून थकून गेले व मन विचार करून दमून गेले. परंतु एखादया परक्या गावी परका मानूस गेला तर त्याचे आश्रयाचे ठिकाण म्हणजे त्या गावची तालीम व तुळशीदासांनी तालीम गाठली व तेथेच मुक्काम केला. त्यांच्या आयुष्याला वळण देणारी पहिली रात्र त्यानी तालमीत काढली. सकाळी उठून गिरणी कामगाराच्या घोळक्यात शिरून गिरणीचा रस्ता धरला. गिरणीचे फाटकात येताच तेथील चौकीदाराने त्यांच्याकडे पाहिले. त्याने गोंधळलेला चेहरा पाहून हा रोज येणारा कामगार नव्हे असे ओळखले. चौकीदाराने त्याना आडवले व आत जाण्यास मनाई केली. अशा प्रकारे नोकरीची पहिली संधी हुकली व नंतर ते पत्र्याच्या तालमीत गेले. दुस–या दिवशी तसाच प्रयत्न केला. "दैव अनुकूल असले म्हणजे योग जुळून येतात" तेथील फाटकाजवळ वैरागचे श्री देवीसिंग रजपूत उभे होते. त्यानी तुळशीदासाना वैराग येथे

शिक्षणाच्या काळात पाहिले होते. त्यानी तुळशीदासाला विचारले, का रे तु दहिटण्याच्या सुभानराव जाधवांचा मुलगा ना ? होय, मग इकडे का आलास ? तेव्हा खालच्या आवाजात तुळशीदास उत्तरला, नोकरी मिळविण्यासाठी. तेव्हा देवीसिंग रजपुताने विचारले कोठे रहातोस ? पत्र्यांच्या तालमीत. तुळशीदास म्हणाला. या वरून देवीसिंगाला सर्व परिस्थितीची कल्पना आली.

तिकीट क्लार्कची नोकरी –

देवीसिंगाने तुळशीदास सोलापुरला का आला या परिस्थितीची कल्पना आल्यानंतर त्यानी तुळशीदासाला घरी नेले. तो दिवस तसाच गेला. दुस–या दिवशी देवीसिंगने त्याना आपल्या बरोबर गिरणीत नेले. देवीसिंग त्यावेळेस जुन्या गिरणीत तिकीट क्लार्कच्या वरचे सुपरवायझर होते. तेव्हा आपल्या संबंधामुळे त्यानी तिकीट क्लार्क म्हणून नोकरीला लावले. कांही दिवसानी नोकरी रात्रपाळीची आली. रात्रपाळी आल्यानंतर तुळशीदासांना फार आनंद झाला. पगार दरमहा 18 रूपये होता. त्यामुळे त्या 18 रूपयात तुळशीदासाचा खर्च भागणार नव्हता. त्यामुळे रात्रीच्या वेळेस रात्रपाळी करायची व दिवसा आपल्याला इतर व्यवसाय करता येईल व आई वडिलांना थोडेसे का होईना सुख देता येईल. असा विचार त्यानी केला. परंतु पहिल्या महिन्यात खाण्यापिण्याची व्यवस्था करणे आवश्यक होते. तेव्हा एका महिन्याची व्यवस्था देवसींगने केली. पहिल्या महिन्याचा पगार 18 रूपये मिळाला. तेव्हा एक वेळच्या जेवणाच्या खाणावळीसाठी 5 रूपये ठेवून बाकीचे 13 रूपये आई–वडिलांना पाठवत होते.

रात्रीच्या वेळेस रात्रपाळी करून दिवसा त्यानी मामलेदार कचेरीत उमेदवारी करण्यास सुरूवात केली. मामलेदार कचेरीत इंग्रजी नकला करण्यास 12 पैसे आणि मराठी नकला करण्यास

9 पैसे मिळत असत> 3 पैसे मिळविण्याच्या महत्वाकांक्षेने तुळशीदास इंग्रजी शिक्षण संपादन करण्याचा प्रयत्न करून लागले. दिवसा मामलेदार कचेरीत काम व गिरणीत रात्रपाळी करून उरलेला वेळ झोप व इंग्रजी शिक्षणासाठी घालवत असत. मामलेदार कचेरीत काम करत असताना त्यांना शेतक–यांशी अतिशय जवळचा संबंध येऊ लागला. शेतक–यांवर कसे अन्याय होतात याची त्याना कल्पना येऊ लागली. तेव्हा त्यानी शेतक–यांची बाजू घेवून अन्यायाविरूध्द झगडण्यास सुरूवात केली. ही गोष्ट इंग्रज सरकारची इमाने इतबारे सेवा करणाऱ्या–याना रूचली नाही. हळू हळू कचेरीत त्यांच्या विरूध्द तंग वातावरण निर्माण होऊ लागले. त्यातच त्यांच्या डोक्यावरील गांधी टोपीने अधिक भर घातली. तेव्हा मामलेदार कचेरीतील कारकुनाने तुळशीदासविरूध्द खोटे पत्र त्यावेळचे असिस्टंट कलेक्टर मे. शिलीगनसाहेब यांच्याकडे पाठवले. आपल्या विरूध्दच्या वातावरणाची जाणीव होताच त्यानी उमेदवारी करण्याचे सोडून दिले. त्यावेळेस ते इंग्रजी चौथीची परीक्षा बाहेरून उत्तीर्ण झाले.

मामलेदार कचेरीतील नोकरी सोडल्यानंतर त्यानी सोलापूर येथील हरीभाई देवकरण हायस्कूलमध्ये इंग्रजी 5वी मध्ये आपले नाव दाखल केले. ते शिक्षणात हुशार होते व महत्वाकांक्षी होते. हरीभाई देवकरण प्रशालेमध्ये प्रवेशघेतल्यानंतर तेथे अनेक स्पर्धा होत असत. तेव्हा तुळशीदासही त्या स्पर्धेमध्ये भाग घेत असत. 1922 मध्ये तुळशीदासांनी हरीभाई देवकरण प्रशालेत प्रवेश घेतला तेव्हा भावे गुरूजीकडे वकृत्व स्पर्धेचे काम होते. विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा भरल्यानंतर मुला–मुलामध्ये गडबड असनारच तेव्हा आपल्या सहकार्याना तुळशीदास उपदेश करायचे की, आपल्या भल्याकरिता शिक्षक अनेक गोष्टी करत असतात. आपण दुर्लक्ष करणे व गडबड करणे आपल्या हिताचे नाही. तेव्हा शिक्षक सांगतील ते ऐकून आपल्या ज्ञानात वाढ करणे

आवश्यक आहे. यावरून हे लक्षात येते की, तुळशीदास विद्यार्थी दशेत असताना सुध्दा आपल्या गुरूजनांकडून मिळणारे ज्ञान मोठया प्रमाणात ग्रहन करत होते व किती समजुतदारपणा या विद्यार्थ्यांकडे होता हे लक्षात येते. [11]

तुळशीदासाचे शिक्षण हरीभाई देवकरण प्रशालेत सुरू होते. त्यावेळच्या सुमारास म्हणजे दि. 22 फेब्रुवारी, 1926 रोजी तुळशीदासांना पहिले कन्यारत्न झाले व तिचे नाव कलावती असे ठेवण्यात आले.

राजकारणात प्रवेश –

तुळशीदास हरीभाई देवकरण या प्रशालेमध्ये शिकत असताना श्री. जी.पी. पटवर्धन, श्री. गोविंदराव शिलोरे, पै. करंदीकर अशा एकाहून एक नामवंत शिक्षकांचा त्यांना सहवास मिळाला होता. सर्वांचे प्रेम तुळशीदासाने संपादन केले होते. सर्वांना तुळशीदासाची शिक्षणाविषयी असलेली आवड लक्षात आल्यामुळे ते त्यांच्या शिक्षणावर विशेष लक्ष ठेवून होते. शिक्षण चालू असताना महात्मा गांधीच्या विचाराने प्रेरीत झालेल्या तुळशीदास अनेक राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊ लागले. त्यात स्वदेशी मालाचा स्वीकार करणे जातीभेद नाहीसा करून समता व बंधुता प्रस्थापीत करणे या कामात तुळशीदास आघाडीवर राहिले. या माध्यमातून इंग्रजी साम्राज्यास कांही देशबांधवानी सुरूंग लावण्याचा कसोसीने प्रयत्न केला.

1921 साली महात्मा गांधीनी भारतातील सर्व लहानमोठया गरीब–श्रीमंत माणसात निर्भयता प्रत्यक्ष यावी म्हणून कायदेभंगाचे पहिले पाऊन टाकले. 1921 साली झेंडा सत्याग्रह सर्व

देशभर सुरू झाला. महाराष्ट्रात या झेंडा सत्याग्रहानिमित्ताने खूप लोक पुढे आले. ही झेंडा चळवळ सुरू असताना सोलापूर जिल्हयातही कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. सोलापूर जिल्हयातून या चळवळीत रामकृष्ण जाजु हे पुढे आलेले तरुण होते. व त्याबद्दल त्यांना शिक्षाही झाली होती. 1921 ते 1927 पर्यंत लोकसंग्रह करण्याच्या या विधायक कामास महात्मा गांधीनी सुरुवात केली होती. या विधायक कामासाठी चरखा, खादी, हातघाणी, आश्रम पध्दती इत्यादि माध्यमे हाती घेतली होती. या कामातही सोलापूर जिल्हा मागे नव्हता. सोलापूर जिल्हयात खेडोपाडयात याचे लोन पोहचले होते. या कामात तुळशीदास जाधव, रामकृष्ण जाजु,परशुराम राठी, मल्लप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, जगन्नाथ शिदे, कमलाकर सुमंत इत्यादि पुढा–यांचा सहभाग होता. या सर्व नेत्यानी सोलापूर जिल्हयातील सर्व 10 तालुक्यामध्ये जाऊन कार्य करणे कॉंग्रेस कमिटी स्थापन करणे, चर्चा करणे, सभा घेणे इत्यादि कामामध्ये तुळशीदास जाधव व भाई छन्नुसिंग यांचा मोठया प्रमाणात सहभाग होता.

1927 मध्ये सायमन कमिशनवर बहिःष्कार घातल्याने जिल्हयात फार मोठी जागृती झाली. 1921 ते 1927 सालापर्यंत वरील विधायक कामे व जिल्हयातील कॉंग्रेस कमिटीच्या स्थापना व कॉंग्रेस कार्यकर्त्यांना दिशा दाखविण्याचे काम जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष जाजुजी व तुळशीदास जाधव सभा चर्चेद्वारे करत होते. 1927 साली देशात सायमन कमिशन आले. त्याला सर्व जिल्हयात कॉंग्रेस कमिटीतर्फे विरोध म्हणून प्रचार सभा, बहिःष्कार वगैरे कार्यक्रम हाती घेण्यात आले. त्याचवर्षी बॉम्बे कौन्सीलने जमीन तुकडेबील आणून जो कायदा केला होता त्या कायद्याला सोलापूर जिल्हयातील कार्यकर्त्यांनी व राजकीय पुढा–यानी फार विरोध केला होता. महाराष्ट्राचे त्यावेळचे पुढारी शंकरराव देव, देवगीरीकर, केशवराव जेथे, शंकरराव मोरे, ज्ञानोबा

जाधव या पुढा–यानी सोलापूर जिल्हयात येऊन कार्यकर्त्यांना फार मोठी मदत केली होती. ज्यावेळेस तुळशीदास राजकीय चळवळीत भाग घेत होते त्या वेळेस 1928 साली त्यांचे वडील श्रीयुत सुभानराव जाधव यांचे देहावसान झाले. या घटनेने तुळशीदासावर दुःखाचा डोंगर पसरला. तेव्हा कुटुंबाची सर्व जबाबदारी तुळशीदासांच्या खांद्यावर येऊन पडली होती. 1930 मध्ये ते मॅट्रीकच्या परीक्षेला बसले. एकीकडे शालेय शिक्षण दुसरीकडे चरितार्थासाठी नोकरी आणि तिसरी बाजू म्हणजे राष्ट्रसेवेसाठी चळवळीत भाग घेणे असे त्यांचे तिहेरी कार्य चालू होते.[12]

सोलापुरमध्ये शिक्षण चालू असताना व चळवळीमध्ये भाग घेतला असल्यामुळे तुळशीदासांचा शहर कॉंग्रेस कमीटीतील दे.भ. रामकृष्णजी जाजु, कै. परसरामजी राठी वगैरे पुढा–यांशी संबंध येऊ लागला. त्यामुळे कॉंग्रेसच्या ही कार्यात ते भाग घेऊ लागले. त्यावेळेस 5 मे, 1930 रोजी महात्मा गांधीनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. गांधीनी 20–21 सत्याग्रहीना घेऊन पायी वर्ध्याहून दांडी गावी समुद्रकाठी मोर्चा काढला. त्यावेळेस भारतीय जनतेचे अफाट प्रेम महात्मा गाधीवर असल्यामुळे गांधीजी जे जे करतील यावर त्या कामास मदत करणे हेच भारतीय जनतेचे कर्तव्य होते. महात्मा गांधी व त्यांचे सहकारी जसजसे दांडी गावाजवळ गेले, तसतशी जनसांगराची शक्ती खूपच वाढली. महात्मा गांधीना अटक करण्यात आली. ही बातमी सोलापुरमध्ये वा–यासारखी पसरली. सोलापूर शहरात हरताळ पाळण्यात आला. याचवेळी कॉंग्रेस कमिटीचे प्रमुख रामकृष्णजी जाजु, तुळशीदास जाधव, युवक कॉंग्रेसचे जगन्नाथ शिंदे, मल्लप्पा धनशेट्टी, मुस्लीम समाजाचे पुढारी कुर्बान हुसेन, डॉ. अंजोळीकर यांनी हरताळ 3 दिवस चालवावा असा आग्रह धरला. परंतु लोकांचा अमाप उत्साह असल्यामुळे त्यानी हरताळ तसाच चालू ठेवला. या काळात 6–7 व 8 मे, 1930 या दिवशी फार मोठया मिरवणुका झाल्या. शेवटी 8 मे रोजी

मिरवणूक संपल्यानंतर सभा झाली. परंतु मिरवणूक संपल्यानंतर 8 मे रोजी कांही बेशीस्त व असंयमी लोकानी शिंदीची झाडे तोडण्याच्या निमित्ताने सोलापूर शहरात तुळजापूर वेशीजवळ जमा झाले. ही बातमी कलेक्टर नाईट याना समजताच शस्त्राधारी पोलीस जमाव हटवण्यासाठी तेथे गेले. त्यानी गोळीबार केला. त्यात एक तरूण मरण पावला जनता व पोलीस यांची बाचाबाची विकोपाला गेली. अधिका–यांच्या अविवेकी वागणुकीमुळे लोक भयंकर संतापले. पोलीस घाबरून पळू लागले. परिस्थिती अटोक्याबाहेर जाते हे पाहून अधिका–यांनी पुण्याला अधिका–यांकडे धाव घेतली. डी.एस्.पी. रजेवर गेले. तेव्हा 9 मे ते 12 मे चा काळात सोलापुरमध्ये कॉग्रेसचे राज्य होते. त्या काळात सोलापुरमध्ये शांतता व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे होती. शहरात शांतता प्रस्थापीत करण्यासाठी सोलापूरचे उद्योगपती परंतु मुंबईमध्ये वास्तव करून असलेले उद्योगपती शेठ वालचंद हिराचंद व शेठ लालजी नारायण आले होते. त्यांनी लोकांशी चर्चा करून शंतता राखण्याविषयी सूचना दिल्या होत्या. परंतु लष्करी अधिका–यांनी व जिल्हाधिका–यांनी गृहमंत्र्यांची भेट घेऊन सोलापूरातील परिस्थिती अत्यंत स्फोटक असून लष्करी कायदा लागू केल्याशिवाय ती ताळयावर येणार नाही असा रिपोर्ट मुंबईचे गृहमंत्री ना. अनेस्ट यांच्याकडे पाठवला. उभयतामध्ये एकमत झाले व त्यानी 13 मे, 1930 रोजी कारण नसताना सोलापूर शहरात ' मार्शल लॉ ' पुकारला. शेठ वालचंद हिराचंद व शेठ लालजी नारायण यांचे प्रयत्न वाया गेले.

सोलापूर शहरातील " मार्शल लॉ " –

सोलापूर शहरात निर्माण झालेला तनाव कमी करण्यासाठी तुळशीदास जाधव यांनी मिरवणूका काढून, सभा घेऊन लोकाना शांत राहण्यासाठी सांगणे वगैरे कार्य करत होते. अशी

शांतता राखण्यासाठी तुळशीदास कार्यालयाकडे जात असताना बंदुकधा–या पोलीसानी बंदुका त्यांच्यावर रोखल्या तेव्हा त्या पोलीसातील एका अधिका–याने सांगितले की, "जाधव हे शांततेसाठी झगडत आहेत. त्यांना कांही करू नका, परंतु इंग्रज अधिका–याने परिस्थितीचा विचार न करता सोलापूर मध्ये " 13 मे 1930 रोजी मार्शल लॉ " कलेक्टरने पुकारला. मार्शल लॉ पुकारल्यानंतर सूचना देण्याचे काम त्यानी केले नाही. तेव्हा इंग्रज अधिका–यांने गुरखा फलटण सोलापूरला पाठवले व दिसता क्षणी गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आले. परंतु गुरखा फलटण तसे करण्यास तयार नव्हती. म्हणून युरोपियन गो–या लोकांची मिलीटरी बोलावली व या फलटणीने शहरात सर्वत्र हिंसेचा मार्ग स्वीकारला. परंतु शहरातली प्रत्यक्ष पहाणी करण्यासाठी कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी श्री. तुळशीदास हे कार्यालयातून सायकलवरून बाहेर पडले. ते आझाद चौकात (मेकॉनकी चौकात) आले तेव्हा त्यांच्या डोळ्यावरील गांधी टोपी पाहून खवळलेल्या सोल्जरने त्यांच्याकडे बंदूक रोखून फर्मावले की, "ठहरो, यु बूट निकालो तुम्हारी व्हाईट कॅप नहीं तो गोली चलाऊंगा. तेंव्हा ते कांहीच बोलले नाहीत. तेव्हा तो म्हणाला, "तुम्हारी सफेद टोपी तुरंत निकालो नहीं तो मैं तुम्हा री जान लुंगा ।" तेव्हा त्यांनी टोपी काढण्यास नकार दिला तेव्हा सोल्जरने त्यांना टोपी काठण्यास सांगितले. तेव्हा त्यानी आणखीही नकार दिला तेव्हा खवळलेले इंग्रज सोल्जर त्यांना इंग्रजीत शिव्या देत त्यांनी तुळशीदासावर संगीनी रोखल्या. हे सर्व दृश्य सोलापूरातील मेकॉनीक चौकातील लोक इमारतीवरून दारे खिडक्या बंद करून पहात होते. तेव्हा सोल्जर कडाडला, "तुम्हारी टोपी निकालो नहीं तो मै तुम्हे मार डालुंगा । मृत्यूचे तांडव डोळ्यापुढे उभे असताना मृत्युला न भिता त्यांनी टोपी काढण्यास नकार दिला होता. शत्रुच्या पाशवी सामर्थ्यापुढे निर्धाराने आणि निर्भयतेने प्राणाप ण करण्यासाठी ठामपणे उभे

रहाण्याची महात्माजींची शिकवण या तरूणाने आत्मसात केली होती. तेव्हा सशस्त्र शक्तीपुढे निशस्त्र आत्मीक सामर्थ्य कधीच हार जात नाही. हे त्याना माहीत होते. शेवटी इंग्रज अधिका–याने या तरूणाची देश स्वातंत्र्याविषयी निष्ठा पाहून त्याला शिक्षा फर्मावली. [13]

तुळशीदासाने गांधी टोपी काढण्यास नकार दिल्यामुळे कॅप्टनने तुळशीदासाच्या छातीवर पिस्तुल ठेवून तीन सोल्जरनी तीन बाजूनी संगीनी रोखून पुन्हा टोपी काढण्यास सांगितले. तरी सुध्दा त्यानी टोपी काढण्यास नकार दिला. शेवटी त्या गो–या लोकानी त्यांच्या डोळयावरची टोपी स्वतःच काढून टाकली व त्याना अटक केली हा सर्व प्रकार 13 मे रोजी सकाळी झाला. त्याचवेळी कॉंग्रेसचे अध्यक्ष रामकृष्ण जाजु यानाही पकडून धर्मशाळेत आणले. त्याचप्रमाणे मल्लप्पा धनशेट्टी जगन्नाथराव शिंदे, कुर्बान हुसेन, सारडा यानाही पकडण्यात आले. तेव्हा तुळशीदास जाधव व रामकृष्ण जाजु हे कॉंग्रेसचे पदाधिकारी असल्यामुळे तुळशीदासांना 10 वर्षे सक्त मजुरी व 3 हजार रूपये दंड व जाजुजींना 7 वर्ष सक्त मजुरी व 2 हजार रूपये दंड, बाकी सर्वांना एक वर्षाची शिक्षा देण्यात आली. ज्या पुढा–यानी मार्शल लॉ च्या काळात चळवळीत भाग घेतला होता त्यानाही कोर्टापुढे उभे करण्यात आले होते. त्यामध्ये माणिकचंद शहा, राजवाडे गुलाबचंद इत्यादींना तुरूंगात जावे लागले होते. सोलापुर शहरात मार्शला लॉ पुकारल्यानंतर इंग्रजी अधिका–यांनी जो कहर केला होता तसाच कहर त्यानी सोलापूर जवळ असलेल्या वळसंग या गावी उडविला होता. तेथील जनतेला खूप मारहान केली होती. तेव्हा सोलापूर शहरानंतर स्वातंत्र्य संग्रामात वळसंग हे गाव आघाडीवर होते. [14]

तुळशीदास व त्यांच्या बरोबर अटक झालेल्या सर्वांना 14 मे, 1930 रोजी लॉरीत घालून फौजदार चावडीजवळ आणले. फौजदार चावडीत आणले दिवशी रात्रभर श्री मल्लम्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन व किसनलाल सारडा या चौघाना पोलीसानी भयंकर मारहान केली होती. त्यामळे त्यांना चालतापण येत नव्हते. दोघा दोघांना बांधून त्याना ढकलत ढकलत लॉरीकडे आणले अशा अवस्थेत त्या चौघाना लॉरीत कोंबण्यात आले. आणि लॉरी कलेक्टर कचेरीकडे नेण्यात आली. त्यावेळेस कर्नल यांचे लष्करी न्यायालय होते. शिक्षा ठोठावण्यासाठी सर्वांना तेथे आणून बसवण्यात आले. पेजच्या समोर एकीकडे तुळशीदास व रामकृष्ण जाजुजी यांना बसवण्यात आले. तर त्यांच्यासमोर म लाप्पा धनशेट्टी कुर्बान हुसेन किसनलाल सारडा व जगन्नाथ शिंदे यांना बसवण्यात आले. या न्यायालयात लष्करी कायद्याखाली पकडलेल्या लेकांना शिक्षा ठोठावण्याचा अधिकार कर्नल पेज यांना होता. या न्यायालयात अपील करण्याची सोय नव्हती. कर्नल पेजच्या मुखातून जी शिक्षा बाहेर पडेल तीच शिक्षा अंतीम असे.

तुळशीदासाना न्यायालयापुढे हजर करण्यात आले तेव्हा त्यानी लष्करी कलम 8 व 11 चा भंग केला असा त्यांच्यावर आरोप होता. लष्करी अधिका–यांची आज्ञा पाळली नाही व गांधी टोपी डोळयावरील जाणून बुजून काढली नाही व लष्करी कायदा पायाखाली तुडवला असा त्यांच्यावर आरोप होता. तेव्हा कर्नल पेजने बेभान होऊन "दहा वर्ष सक्त मजुरी व 3 हजार रूपये दंड" अशी शिक्षा ठोठावली. पण कर्नल पेजच्या शेजारी बसलेला ॲडी डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट मि. कोठावाला म्हणाले, 'शिक्षा फार होते' यावर कर्नल पेज क्षणभर तुळशीदासाकडे रागाने पहात म्हणाला 'सात वर्ष सक्त मजुरी व तीन हजार रूपये दंड' त्याच दिवशी "मार्शल लॉ" खाली अटक करण्यात आलेले जिल्हाध्यक्ष जाजुजी यांनाही शिक्षा ठोठावण्यात आली.

परंतु त्यावेळी मार्शल लॉ खाली ज्या ज्या लोकांना शिक्षा झाल्या त्या सर्वापेक्षा जास्त दिर्घकाळ शिक्षा ही तुळशीदासांना झाली होती. [15]

तुळशीदासाची शिक्षा निश्चित झाली तेव्हा त्यांच्या डोळयासमोर आपल्या आईची मुर्ती उभी राहिली त्याना वाटले की आता आपल्याला झालेली शिक्षा ऐकून आईला खूप वाईट वाटेल. आईच्या आठवणीने त्यांचे अंतःकरण भरून आले. स्वातंत्र्याचे मंदीर गाठण्यासाठी ध्येयवेडया देशभक्ताला रसरसीत पायघडयाच्या निखाऱ्याच्या पायघडयावरून होरपळणा–या पायानी चालत जावे लागते. आणि त्याच पायघडयावर त्यांनी हे पहिले पाऊल ठेवले होते. शिक्षेची वार्ता ऐकून तुळशीदासांच्या पत्नीला फार दुःख झाले. तेव्हा शिक्षेची बातमी समजताच कोणताही विचार न करता विरमाता व विरपत्नी भाकरी बांधून सोलापूरकडे निघाल्या. सोलापूरातील तुरूंगात गेल्या. तुळशीदास शिपायांच्या सशस्त्र पहा–यात शून्य मनाने बसले होते. तेवढयात समोर येणा–या आईला व पत्नीला पाहून त्यांच्या डोळयातून अश्रु वाहू लागले. आपल्या आईने आपल्यासाठी किती कष्ट यातना सहन केल्या याचा इतिहास त्यांच्या डोळयासमोर तरळू लागला. त्यावेळी विरपत्नी जनाबाई यांच्याही अंतःकरणाला हे दृश्य पाहिल्यानंतर फार वाईट वाटले. त्यांची भेट झाली त्या दिवशीच्या रात्री तुळशीदासांना विजापुरला नेण्यात येणार होते. ज्या–ज्या लोकांना मार्शल लॉ खाली अटक केली होती त्या सर्वांना विजापुरला नेणार होती. त्या दिवशी सर्वांच्या आप्तेष्टांनी प्लॉटफॉर्म भरला होता. त्यामध्ये रंगुबाई या विरमाता व जनाबाई या विरपत्नी प्लॅट फॉर्मवर हजर होत्या. गाडी सुटताच सर्वांनी "भारत माता की जय, महात्मा गांधी की जय" असा जयघोष करून सर्व प्लॉटफॉर्म दुमदुमला. अशा प्रकारे हे सर्व लोक किती देशप्रेमाने किती झपाटलेले होते व भारत देश स्वतंत्र व्हावा या देहाने झपाटलेले होते, हे दिसून येते.

तुळशीदास हे मार्शल लॉ खाली झालेली शिक्षा भोगत होते तेव्हा त्याना 3 हजार रूपये दंडही फर्मावण्यात आला होता. त्या दंडाची भरती करण्यासाठी त्यांच्याजवळ पैसे नव्हते. तेव्हा त्या तीन हजार रूपये दंडासाठी सरकारने तुळशीदासचे दहीटणे येथील छोटेसे शेत आणि घर जप्त करून लिलावात काढले. परंतु दहीटण्याचे नागरिक देशप्रेमी होते व देशाभीमानी होते. तुळशीदासांना कशासाठी शिक्षा व दंड झाला याची त्याना जाणीव होती. म्हणून लिलावात कोणीही बोलले नाही. त्यामुळे ते जप्त अवस्थेत तसेच राहिले. [16]

तुळशीदासांना विजापुरच्या तुरूंगातून परत येरवडयाच्या तुरूंगात नेण्यात आले. येरवडयाच्या तुरूंगात त्यांना चक्कीवर चाळीस पौंड दळण दळण्याचे काम देण्यात आले. दळण उभ्याने दळावे लागत असे व तेही आठ तासात. दळण दळत असताना अशक्त शरीर प्रकृतीमुळे त्याना चक्कर येत असे. दळण दळल्याने त्यांना पोटाचा आजार वाढला होता. त्याना दळण दळत नसल्यामुळे खुप मार खावा लागला होता. याच सुमारास नान्नजचे कोंडीबानावाचे एक गृहस्थ जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. त्याना दिर्घमुदतीची कैद असल्यामुळे त्यांच्याकडे मुख्य वार्डरचे काम होते. जेलचा सुपरीडेंटचा 'रक्षक कोंडीबाबरोबर नेहमी असे. त्याचवेळी सोलापूर तालुक्यातील मल्लाप्पा पाटील हे ही त्याच तुरूंगात होते. त्यानी दळण दळताना तुळशीदासांना किती त्रास होतो हे पाहिले होते. तेव्हा मल्लाप्पाने कोंडीबाची भेट घेऊन तुळशीदासांची त्रास देत असताना पाहिलेली परिस्थिती सांगून त्यांना कमी त्रास देण्याविषयी सांगितले.

तुळशीदास येरवडयाच्या तुरूंगात असताना सोलापूरच्या इतिहासात एक विचित्र घटना घडली. दि. 12 जानेवारी, 1931 रोजी सोलापूरचे चार विर जवान सर्वश्री मल्लाप्पा धनशेट्टी,

कुर्बान हुसेन, किसनलाल सारडा व जगन्नाथ शिंदे यांना फाशी देण्यात आली. या चौघाना फाशी दिल्याची वार्ता सर्वत्र वा–यासारखी पसरली. एका भाजीवाल्याने दहीटण्यात जाऊन सांगितले की या चार जनाबरोबर तुळशीदासालाही फाशी देण्यात आली. ही वार्ता ऐकून सर्वांना खूप वाईट वाटले. सर्वत्र हळहळ करू लागले. परंतु तुळशीदासांचे सासरे आबा साठे यांना ही बातमी कळताच धक्का बसला ते आजारी पडले व त्या आजारातच ते थोडया दिवसात निधन पावले. तुळशीदासांनी येरवडयाच्या तुरूंगात असताना आबांच्या निधनाची वार्ता समजली. त्यांना फार वाईट वाटले. ते अतिशय दुःखी झाले.

तुळशीदास तुरूंगात असताना देशातील सारे वातावरण अशांततामय बनले होते. शांतता प्रस्थापित करून आपला राज्यकारभार सुरक्षीत चालू ठेवणे राज्यकर्त्यांना भाग होते. सरकार व गांधीजी यांच्यात तहाची बोलणी चालू होती. गांधीजी त्यावेळी सा–या भारतीय स्वातंत्र्याच्यावतीने राज्यकर्त्यांचे प्रतिनिधीत्व करीत होते. तहाची बोलणी वरीष्ठ प्रतिनिधी हिंदुस्थानचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्यात सुरू होती. या तहानुसार सोलापुरच्या मार्शल लॉ च्या राजवटीत जो अन्याय झालाा होता ज्याना कठोर शिक्षा ठोठावण्यात आली होती त्या सर्वांची बिनशर्त सुटका करण्यात आली. त्याचवेळी जुनच्या मध्यात 13 महिन्यानंतर तुळशीदासांची सुटका करण्यात आली.

———

प्रकरण पहिले

संदर्भ सूची

1) दे.भ. तुळशीदास जाधव गौरवग्रंथ (43), संपादक – प्रकाशक एम्.बी. साळुंखे, प्रकाशन 25 जानेवारी, 1982

2) चणे खावे लोखंडाचे (8), प्रकाशक – लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली, सोलापूर, लेखक – व्यं.गो. अंदुरकर.

3) दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ (44), प्रकाशक – एम्.बी. साळुंखे, प्रकाशन – 25 जानेवारी, 1982.

4) दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ (48), प्रकाशक – एम्.बी. साळुंखे, प्रकाशक – 25 जानेवारी, 1982.

5) चणे खावे लोखंडाचे (8), प्रकाशक – लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली, सोलापूर, लेखक – व्यं.गो. अंदुरकर.

6) आवाहन (39) संपादक – दिलीप रूद्राक्ष प्रकाशन – डिसेंबर, 1995.

7) चणे खावे लोखंडाचे (8), प्रकाशक – लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली, सोलापूर, लेखक – व्यं.गो. अंदुरकर.

8) उपरोक्त.

9) दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ (60), प्रकाशक – एम्.बी. साळुंखे,
प्रकाशन – 25 जानेवारी, 1982.

10) आवाहन, (25), लेखक – दिलीप रूद्राक्ष,
प्रकाशन – डिसेंबर, 1995.

11) तुळशीदासजींची उदयमशीलता, लेखक – द.प्र. भावे,
संस्थापक – रूग्णोपयोगी वस्तुसंग्रहालय, सोलापूर.
देशभक्त तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ (157)

12) आवाहन, (25), लेखक – दिलीप रूद्राक्ष,
प्रकाशन – डिसेंबर, 1995.

13) दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ (25), प्रकाशक – एम्.बी. साळुंखे,
प्रकाशन – 25 जानेवारी, 1982.

14) आवाहन, (29), लेखक – दिलीप रूद्राक्ष,
प्रकाशन – डिसेंबर, 1995.

15) चणे खावे लोखंडाचे (30), प्रकाशक – लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली,
सोलापूर, लेखक – व्यं.गो. अंदुरकर.

16) चणे खावे लोखंडाचे (32), प्रकाशक – लोकसेवा सहकारी मुद्रणालय, फलटण गल्ली,
सोलापूर, लेखक – व्यं.गो. अंदुरकर.